PUNE RESEARCH TIMES ISSN 2456-0960
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES VOL 5, ISSUE 1

# सुशासनामध्ये भूमि अभिलेख विभागाचे योगदान

रोहिणी निवृत्ती पवार

**रोहिणी निवृत्ती पवार**
**संशोधक विद्यार्थी**
**लोकप्रशासन विभाग**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा औरंगाबाद**
**(महाराष्ट्र) भारत**

डॉ. भारत गोरे

**सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख**
**लोकप्रशासन विभाग**
**विवेकानंद कला, सरदार दलिपसिंग वाणिज्य**
**आणि विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद**
**(महाराष्ट्र) भारत**

स्वराज्यानंतर जशी सुराज्याच्या संकल्पनेची चर्चा होताना दिसून येते. त्यानुसार शासनानंतर सुशासन संकल्पनेची विशेष चर्चा होताना दिसून येते. सुशासन हि संकल्पना अप्रत्यक्षरित्या राज्याच्या निर्मितीपासून अस्तित्वात आहे. केवळ तिचे प्रत्यक्ष प्रकटीकरण २१ व्या शतकात जागतिकीकरणाच्या आधारे भूमीवर झालेले दिसून येते. व्यक्तीचे स्वातंत्र्य अबाधित रहावे व व्यक्तीच्या जीवनकार्यात सरकारने कमीत कमी हस्तक्षेप करावा हि उदारीकरणाची लोकशाहीभिमुख भूमिका सुशासन निर्मितीला सहायक ठरत आहे. अर्थात जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरणाच्या पार्श्वभूमीवर कल्याणकारी राज्यातील शासकीय व्यवस्थेचे सुशासन हे आधुनिक रूप आहे.

भारतासारख्या लोकशाही व बहुविविध वैशिष्टये असलेल्या समाजात जनकल्याण आणि देशाची सुव्यवस्था या दृष्टीने एक कटिबद्ध कुशल इमानदार आणि सक्षम प्रशासन निर्मिती हा एकमेव पर्याय आहे. उदारीकरण, खाजगीकरण, जागतिकीकरणाच्या नवीन मार्गामुळे देशातील जनतेत एक नवचैतन्य व उत्साह निर्माण झाला आहे.

१९८९ ला जागतिक बँकेने अहवालात आपल्या सर्वप्रथम governance हा शब्दप्रयोग केला. पुढे १९९० नंतर सुशासन हि संकल्पना विशेष चर्चेत आली. १९९२ ला प्रकाशित झालेल्या ``Good Governance & Development" अहवालात जागतिक बँकेने सुशासनासंबंधित विस्तृत चर्चा केली. सुशासन हे अनेक आदर्शावर आधारित असते. जनतेच्या अधिक जवळ जाणारे असे शासन आहे. ज्यात जनतेच्या अपेक्षा अधिक प्रभावीपणे व परिणामकारकरित्या जाणून घेता येऊ शकतात व त्यासाठी अधिक जनताभिमुख होऊन कार्य केले जाते.

**सुशासन आणि भूमि अभिलेख विभाग :**

सुशासन प्रक्रियेत भूमि अभिलेख विभाग हा महत्त्वपूर्ण कार्य करतो. भूमि अभिलेख विभाग प्रामुख्याने मोजणी म्हणूनच ओळखला जातो. मोजणी व त्या अनुषंगाने या विभागांतर्गत कार्य करण्याच्या निमित्ताने जनतेशी प्रत्यक्ष संबंध या विभागाचा येतो.

भूमि अभिलेख विभागामार्फत वन विभागाची मोजणी केली जाते. तसेच मोजणीमुळे जनतेच्या स्वतःच्या हक्काचे खरे क्षेत्र त्यांची जमीन लक्षात येते व त्यावरून महसूल कराची आकारणी करता येते व त्यामुळे सरकारला महसूल जमा करता येतो व सरकारी उत्पन्नावर भर पडतो. यावरून स्पष्ट होते कि, महसूल व वन विभागाचा आधारस्तंभ भूमि अधिलेख विभाग आहे. जनतेला सहकार्य करणे हे भूमि अभिलेख विभागाचे उद्देश आहे. "विलंब टाळा व कार्यक्षम व्हा" हे या विभागाचे ब्रीदवाक्य आहे. सरकारी पडीक जमीन गायरान, जमीन लागवडी योग्य जमिनीची मोजणी, विकास योजनेची, प्रकल्प मोजणीची कामे अशी महत्वपूर्ण कार्य या खात्यामार्फत केली जातात. त्यामुळे दिवसेंदिवस खात्याची जबाबदारी वाढत आहे.

भूमि अभिलेख विभाग केवळ मोजणी करत नाही तर जमिनीसंबंधी अभिलेख जतन करणे व त्याची जनतेस मागणी अन्वये निरीक्षण, शोध व प्रमाणित करून देण्याचे काम या विभागामार्फत केले जाते त्यामुळे या खात्याचा जनतेशी प्रत्यक्ष संबंध येतो.

महाराष्ट्राची मूळ महसूल मोजणीव जमाबंदीचे काम कायद्यांतर्गत करण्यात आले आहे. पश्चिम महाराष्ट्रासाठी माहिती मुंबई जमीन महसूल कायदा तर मराठवाड्यासाठी हैदराबाद जमीन महसूल कायदा विदर्भासाठी मध्यप्रदेश जमीन महसूल अधिनियम व बेरार मधील जिल्हयाचे (अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ) मूळ भूमापन व जमाबंदीचे हे काम बेरार जमीन महसूल अधिनियमानुसार झाले. सदर कामकाजा दरम्यानचे तयार अभिलेख जतन करण्यासाठी तसेच मुख्यत: जनतेकडून शासन महसूल जमा करताना तसेच त्यांच्या मालमत्तेवर कर लादताना घराचे क्षेत्रफळ ठरवूनच त्यांच्याकडून महसूल जमा केला जातो परंतु जमिनीबाबतचे क्षेत्रफळ ठरविण्यासाठी शासनाने सन १९०० मध्ये भूमी अभिलेख विभागाची स्थापना केली. राज्यातील जमीन महसुलाची कामे या विभागांतर्गत केली जाते. या विभागाकडून केलेल्या कामामुळे महसूल प्रशासनासाठी लागणारी आवश्यक ती सर्व माहिती पुरविण्यास मदत होते.

**राष्ट्रीय भूमी अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम (Digital India National Land Record Modernization Programme DINLMP)**

जमीन हि मुलभूत परंतु मर्यादित संसाधन असून वाढत्या लोकसंख्येमुळे त्यावर तान येत आहे. त्यामुळे भूमीशी संबधित अभिलेखाचे व्यवस्थापन प्रत्येक राज्यासाठी, देशासाठी आवश्यक आहे. या अभिलेखाचे कायदेशीर महत्व अनन्यसाधारण असून त्यांचे व्यवस्थापन साठवणूक व जतन ही आव्हानात्मक बाब आहे. या अभिलेखाचे महत्त्व लक्षात घेऊन केंद्र शासनाच्या भूमि संसाधन विभाग, ग्रामीण विकास मंत्रालयाकडून २००८ पासून राष्ट्रीय भूमी अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम सुरु करण्यात आला आहे. या

PUNE RESEARCH TIMES ISSN 2456-0960
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES VOL 5, ISSUE 1

कार्यक्रमांतरंगत संगणकिकृत सातबाराच्या डाटा अद्ययावतीकरण करणे, भूमिविषयक नकाशांचे डिजीटायझेशन करणे, संगणकाद्वारे महसूल कार्यालयाची समांतर जोडणी करणे, तालुका स्तरावर अत्याधुनिक भूमी अभिलेख कक्ष निर्माण करणे, पुनरमोजणी करणे, दुय्यम निबंधक कार्यालयाचे संगणकीकरण करणे, सूची 2 ची डाटा एन्ट्री करणे, दुय्यम निबंधक कार्यालयाची महसूल कार्यालयाशी जोडणी करणे, प्रशिक्षण व क्षमता विकास करणे, कायद्यामध्ये बदल नोंदणी, अधिनियम १९०८ मध्ये बदल, मुद्रांक अधिनियम १८९९ मध्ये बदल, मालकी हक्काचा प्रारूप कायदा, इतर अनुषंगिक कायदे बदल हि कार्ये पार पाडली जात आहे.

Computerization of land Record

↓

Digitization of land Record

↓

1. Modernization of land management system
2. Unique identification number for property
3. Digitization cadastral maps
4. computerization land record
5. computerized Registration Records

**Table 1 Status of computerized land records in states and UTs (December2018)**

| Sr.No. | Component | Completed above 95% | Ongoing less than 95% | Not started 0% |
|---|---|---|---|---|
| १ | Computerization of land Records (36 states / UTs) | अंदमान निकोबार, आंध्र प्रदेश, दादर नगरहवेली, गुजरात, हिमाचल प्रदेश, लक्ष्यदीप, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, दिल्ली, ओडीसा, राजस्थान, तेलंगना वेस्टबंगाल, | आसाम, बिहार, चंदिगड, दमन आणि दिव, गोवा, हरियाना, जम्मू आणि काश्मीर, केरळ, मणिपूर, पोन्डिचेरी, पंजाब, सिक्कीम, तामिळनाडू, त्रिपुरा, उत्तराखंड, उत्तरप्रदेश | नागलंड, मिझोराम, अरुणाचल प्रदेश, मेघालय |
| २ | computerized | अंदमान निकोबार, | आसाम, छत्तीसगड, दमण | जम्मु & काश्मीर, |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | Registration Records (36 states / UTs) | आंध्र प्रदेश, दादर नगर हवेली, गुजरात, बिहार, मणिपूर, कर्नाटक, झारखंड, केरळ, मध्यप्रदेश, त्रिपुरा, वेस्टबंगाल, महाराष्ट्र, दिल्ली, ओडीसा, राजस्थान, तेलंगना, चंदिगड, दमन आणि दिव, | अँड दीव, गोवा, हरियाणा, हिमाचल प्रदेश, मेघालय, पंजाब, सिक्कीम, तामिळनाडू, उत्तराखंड, उत्तर प्रदेश | मिझोराम, अरुणाचल प्रदेश, लक्षद्वीप |
| ३ | Integration of Cadastral Maps with RoRs (36 states / UTs) | गोवा, ओडीसा, त्रिपुरा | अंदमान अँड निकोबार, आंध्र प्रदेश, छत्तीसगड, हिमाचल प्रदेश, झारखंड, राजस्थान, तामिळनाडू, तेलंगणा, मध्य प्रदेश, वेस्ट बंगाल, आसाम, दादर अँड नगर हवेली, गुजरात, सिक्कीम, उत्तर प्रदेश | अरुणाचल प्रदेश, बिहार, हरियाणा, केरळ, महाराष्ट्र, जम्मू आणि काश्मीर, मिझोराम, नागालँड, चंदीगड, दमण अँड दीव, मणिपूर, पोंडीचेरी, उत्तराखंड, कर्नाटक, लक्षद्वीप, मेघालय, पंजाब, दिल्ली |
| 4 | Digitization of cadastral Maps | आसाम, बिहार, दादर अँड नगर हवेली, गोवा, हिमाचल प्रदेश, मध्य प्रदेश, ओडिसा, सिक्कीम, पोंडीचेरी, तामिळनाडू, त्रिपुरा | अंदमान अँड निकोबार, आंध्र प्रदेश, गुजरात, छत्तीसगड, हरियाणा, झारखंड, केरळ, महाराष्ट्र, पंजाब, राजस्थान, तेलंगणा, उत्तराखंड, उत्तर प्रदेश, वेस्ट बंगाल | अरुणाचल प्रदेश, जम्मू अँड काश्मीर, मिझोराम, नागालँड, चंदीगड, मणिपूर, लक्षद्वीप, मेघालय, कर्नाटक, दमण अँड दीव, दिल्ली |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 5 | Connectivity Between Sub-Registrar offices (SROS) | आंध्र प्रदेश, दादर अँड नगर हवेली, गुजरात, झारखंड, केरळ, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, दिल्ली, तेलंगणा, त्रिपुरा, ओडिसा | अंदमान अँड निकोबार, आसाम, बिहार, दमण अँड दीव, हरियाणा, हिमाचल प्रदेश, पंजाब, राजस्थान, सिक्कीम, तामिळनाडू, उत्तर प्रदेश, वेस्ट बंगाल | अरुणाचल प्रदेश, चंदीगड, छत्तीसगड, जम्मू आणि काश्मीर, मिझोराम, नागालँड, गोवा, मणिपूर, कर्नाटक, लक्ष्यद्वीप, मेघालय, पोंडीचेरी, उत्तराखंड |

उपरोक्त तक्त्यावरून राष्ट्रीय भूमी अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम अंतर्गत केंद्रशासित प्रदेश व राज्यातील भुमी अभिलेखबाबत सद्यस्थिती लक्षात येते. देशात आधुनिक, सर्वंकष आणि पारदर्शक भूमि अभिलेख व्यवस्थापन पध्दती तयार करून निर्णायक मालकी हक्क पध्दती बरोबरच मालकी हक्काची शाश्वती देणे हे उद्दिष्ट साध्य होईल. तसेच सुशासनाच्या दृष्टीने भूमी अभिलेख विभाग कालसापेक्ष व उपयुक्त ठरेल व विभागाच्या दृष्टीने नवीन दिशा देणारे असेल.

## संदर्भ ग्रंथ

1) Baghel C.L., Yogendra Kumar (2006), "Good Governance concept and approaches" Kanishka publishers, Distributors, New Delhi.
2) Dr.Shirsath, Dr. Prashant Amrutkar (2007), "Good Governance"chenmay Prakashan, Aurangabad.
3) Kuldip Rai and D. K. Bhalla ( 2013), "computerization of land Record in India"
4) कारंडे पांडुरंग, "भूमि अभिलेख विभाग व भूमापनाचा पूर्व इतिहास" भूमि अभिलेख विभाग महाराष्ट्र राज्य पुणे
5) डॉ. लालसिंग मिसाळ, " राष्ट्रीय भूमि अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम" भूमि अभिलेख विभाग महाराष्ट्र राज्य पुणे.
6) www.dilrmp. gov. in